# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 16 March 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १६ मार्च २०२४ दुपारी १.०० वा.

****

आगामी लोकसभा निवडणुकीसह काही राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचं वेळापत्रक आज जाहीर होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोग दुपारी तीन वाजता पत्रकार परिषदेत निवडणूक कार्यक्रम घोषित करणार असून, त्यानंतर आचारसंहिता लागू होईल.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पत्र लिहून विकसित भारताच्या निर्मितीकरता सूचना देण्याचं आवाहन केलं आहे. गेल्या दहा वर्षांत देशाने मोठी झेप घेतली असून प्रचंड आर्थिक प्रगती पाहिली आहे. परंपरा आणि आधुनिकता या दोन्हींचा मिलाफ करून देश पुढे जात असून, भारताच्या समृद्ध राष्ट्रीय आणि सांस्कृतिक वारशावर भर दिला जात असल्याचं, पंतप्रधानांनी यात नमूद केलं.

अनेक योजना आणि उपक्रमांमुळे देशाचा चेहरामोहरा बदलला आहे, यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना, आयुष्मान भारत, मातृ वंदना योजना, जीएसटीची अंमलबजावणी, कलम ३७० हटवणं, नारी शक्ती वंदन कायदा आणि नवीन संसद भवनाचं उद्घाटन यांचा समावेश आहे. जनतेनं आपल्यावर विश्वास दाखवल्यामुळेच हा बदल शक्य झाल्याचं पंतप्रधान म्हणाले. देशाला नव्या उंचीवर नेऊन विकसित भारत बनवण्याचा संकल्प साकारण्यासाठी देशवासियांनी साथ द्यावी, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

****

दरम्यान, पीएम-सूर्य घर: मुफ्त बिजली योजनेअंतर्गत एक कोटीहून अधिक कुटुंबांची नोंदणी केल्याबद्दल पंतप्रधानांनी आनंद व्यक्त केला आहे. आसाम, बिहार, गुजरात, महाराष्ट्र, ओडिशा, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशमध्ये पाच

लाखांहून अधिक नोंदणी झाल्याचं त्यांनी ट्विट संदेशात सांगितलं. या योजनेत जास्तीत जास्त नागरीकांनी नोंदणी करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

****

प्रसार भारतीचे संचालक म्हणून नवनीत कुमार सेहगल यांची नियुक्ती करण्यात आली असून, आज त्यांनी पदभार स्वीकारला. सेहगल हे निवृत्त प्रशासकीय अधिकारी आहेत. तीन वर्षांसाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

****

अंगणवाडी सेविकांना निवृत्तीवेतन देण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिलं आहे. रत्नागिरी जिल्ह्यातल्या खेड इथं अंगणवाडी सेविकांना मोबाइल वाटप काल तटकरे यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. वीज नसलेल्या अंगणवाड्यांमध्ये सौर ऊर्जेची सोय केली जाणार असून, त्यासाठी पहिल्या वर्षी ३६ हजार अंगणवाड्यांचं उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचं तटकरे यांनी सांगितलं.

****

सरहद शौर्याथॉन-२०२४ या स्पर्धेच्या बोधचिन्हाचं आणि संकेतस्थळाचं अनावरण काल मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. सरहद पुणे, भारतीय लष्कर आणि अर्हम संस्था यांच्यातर्फे येत्या ३० जून रोजी ही स्पर्धा होणार आहे. जम्मू काश्मीरमधल्या झोजिला युद्ध स्मारक ते कारगिल युद्ध स्मारकादरम्यान होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत, भारतासह विविध देशातले धावपटू सहभागी होतील. झोजिला युद्धातल्या विजयाचा अमृत महोत्सव आणि कारगिल युद्धातल्या विजयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

****

परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा पंचवीसावा दीक्षांत समारंभ कुलपती तथा राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली येत्या मंगळवारी १९ मार्चला होणार आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण कार्यालय परिसरातील सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. विविध विद्याशाखेतील एकूण ११ हजार दोन स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येईल.

****

हिंगोली-मुंबई जनशताब्दी एक्सप्रेसचं आरक्षित तिकीट हिंगोली इथं पहाटे सव्वा चार वाजेपर्यंत देण्याचा निर्णय दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने घेतला आहे.

सामान्य वेळेत सकाळी आठ ते रात्री आठ या वेळेनंतर हिंगोली रेल्वेस्थानकावरच्या फलाट क्रमांक दोन वरील तिकीट खिडकीतून मध्यरात्री १२ वाजेपासून ते पहाटे सव्वा चार वाजेपर्यंत या गाडीचं आरक्षित तिकीट प्रवाशांना घेत येणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ. आंबेडकर सेनेचा ११ वा वर्धापन दिन येत्या २० मार्चला महाड इथल्या चवदार तळे याठिकाणी होणार आहे. त्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यातल्या आंबावडेगाव या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावी सेनेची रॅली जाणार आहे. डॉ. आंबेडकर सेनेचे सेना प्रमुख भाई दिनकर ठोकळ आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष  देविदास लहाने यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

****

ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष्य सेननं उपान्त्य फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या उपान्त्यपूर्व सामन्यात लक्ष्यनं मलेशियाच्या खेळाडुचा २० –२२, २१ – १६, २१ – १९ असा पराभव केला. उपान्त्य फेरीत लक्ष्यचा सामना आज बर्मिंगहम इथं इंडोनेशियाच्या जोनाथन क्रिस्टी सोबत होणार आहे.

****